MHPU130020462023 **नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १०/२०२४**

**निशाणी २४ खालील आदेश**

(श्री. निखील संजय शिंदे वि. राजेंद्र नारायण शिंदे )

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ८ अन्वये दावा काढून टाकण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीने प्रतिवादी यांना शारिरीक, मानसिक व आर्थीक नुकसान करण्याच्या हेतूने दाखल केला आहे. वादी हे दावा दाखल केल्यापासून अद्यापपर्यत हजर राहिलेले नाहीत यावरुन वादीस दावा चालविण्यास रस नसून मे.कोर्टाचा मौल्यवान वेळ वाया घालविण्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे दावा काढून टाकण्यात यावा अशी विनंती केली.

२. सदरच्या अर्जावर वादीतर्फे म्हणणे नि. ३५ कडे दाखल करुन अर्जातील कथन अमान्य व नाकबूल केले आहे. वादीच्या कथनानसुार, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे. प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करुन अर्ज नामंजूर करावा.

३. सदरच्या अर्जावर दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा दावा हा वाटप, स्वतंत्र कब्जाचा व निरंतर मनाईचा आहे. वादीने दाव्यामध्ये पुढील स्टेप्स घेतलेल्या आहेत अशा परिस्थितीत दाव्याचे कामकाज चालू असतांना दावा काढून टाकणे न्याय नाही. दोन्ही पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारामधील वाद कायमस्वरुपी मिटण्यास मदत होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज नि. २८ नामंजूर करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2025.09.08 12:12:06 +0530

सासवड (सौ. एस. क. दशमुख)

दिनांक ०४.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड.

## निशाणी ३२ खालील आदेश

(श्री. निखील संजय शिंदे वि. राजेंद्र नारायण शिंदे )

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. सदरील वादींनी प्रस्तुतचा दावा ठराव, वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतरचे मनाईकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, दाव्यात नजरचूकीने काही मिळकती समाविष्ट केल्या आहेत. दावा कलम १ई व १उ व कलम ७ या मिळकतीं बाबत वादींना वाटप मागण्याचे नाही त्यामुळे त्या मिळकतीं दाव्यातून वगळण्यात याव्यात. तसेच दावा कलम ८ ते १७ यांना अनुक्रमे ७ ते १६ असे नंबर देण्यात यावेत व त्याप्रमाणे विनंती कलमामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून त्यामध्ये दाव्याच्या स्वरुपात बदल होत नाही. अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

३. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ तर्फे म्हणणे नि. ३८ कडे दाखल करुन अर्जातील कथन अमान्य व नाकबुल केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीची मागणी कायदेशीर नाही. वादीने अर्ज देण्यास विलंब केला आहे. ***Ramesh Kumar Vs. Kesho Ram (AIR 1992 SC 700) and Revjeetu Builders Vs. Narayan Swami (2009-10 SCC 84)*** मध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, फक्त न्याय आणि वाजवी बदलासाठी ही तरतूद लागू होते. मालमत्ता काढून टाकल्यास दाव्याचे मुळ स्वरुप बदलेल. ***Ajendraprasadji. P. Pande Vs. Swami Keshavprakashdasji (2006 12 SCC 1)*** नुसार अर्ज चालण्यास पात्र नाही. ***South Konkan Distilleries Vs. Prabhakar Gajanan (2008 14 SCC 632), Vidhyabai Vs. Padmalatha (2009 2 SCC 409)*** मध्ये नमूद केले आहे की, जर बदलामुळे प्रतिवादीच्या बचावावर परिणाम होत असेल तर तो नाकारला पाहिजे. प्रतिवादीच्या हितावर विपरीत परिणाम करण्याचा वादीचा हेतू आहे. त्यामुळे महत्वाच्या मालमत्ता काढून टाकून दावा कमकुवत करत आहेत. अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होणार असून न्यायदानास अडचण होवून प्रतिवादीवर अन्याय होणार आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र. ४ तर्फे म्हणणे नि. ३९ कडे दाखल करुन अर्जातील कथन अमान्य व नाकबूल केले आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीची मागणी बेकायदेशीर स्वरुपाची असून त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार आहे. वास्तविक दावा मिळकतीं या वादीच्या कथनाप्रमाणे वडिलोपार्जित मिळकतीं असून त्या सर्व मिळकती

वाटपाच्या दाव्यामध्ये समाविष्ट असणे आवश्यक आहे. सदर मिळकती वगळल्यास दाव्याचे मुळ स्वरुप बदणार आहे. वादीने अयोग्य कोर्ट फी स्टॅम्प भरला आहे. त्याबाबत प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये अर्ज (२६) दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

५. दोन्ही पक्षातर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुतचा दावा हा दावा ठराव, वाटप, स्वतंत्र कब्जा व निरंतरचे ताकिदीकरीता आहे. अर्जातील कथनावरुन असे दिसून येते की, वादीस दाव्यामध्ये नमूद मिळकत १ई, १उ व कलम ७ मधील मिळकतीबाबत त्यांना वाटप मागण्याचे नाही. त्यामुळे त्या संदर्भात दाव्यात नमूद मजकूर वगळण्याकरीता परवानगी मिळण्यासाठी वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीस सदर मिळकती बाबत वाटप मागण्याचे नाही असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे सदर मिळकती वडिलार्जित असल्या तरी देखिल वादीस त्याबाबत मागणे नाही त्यामुळे त्या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट करुन ठेवणे आवश्यक नाही. सद्यपरिस्थीतीमध्ये दावा मिळकतीमधील दोन्ही पक्षकाराचे हितसंबंध विचारात घेता सदर दुरूस्तीने वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद कायमस्वरूपी मिटणार आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे स्वरूप व वादीने केलेली मागणी पाहता वादीचा अर्ज मंजूर केल्यास दाव्याचे स्वरूप बदलणार नाही. सदरची दुरुस्ती ही दावा मिळकतीशी संलग्न व संबंधीत आहे. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे व पुन्हा दाव्यांची साखळी वाढणार आहे. दावा मिळकतीविषयी वादीच्या असलेल्या मागण्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होण्याकरीता वादीने केलेली मागणी मान्य करणे योग्य होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. अर्ज मंजूर केल्यास दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेस मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## **आदेश**

१. वादीचा अर्ज (नि.३२) मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जामध्ये मागणी केलेली दावा दुरूस्ती करून दावा दुरुस्ती प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

SEEMA KETAN DESHMUKH Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH Date: 2025.09.08 12:12:15 +0530

सासवड. (सौ. एस. के. देशमुख)

दिनांक: ०४/०९/२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड.